# कुपोषणग्रस्त गावाचा आता शाळेसाठी लढा

## आठ महिन्यांपासून खोल्यांची दुरूस्ती रखडली; विद्यार्थ्यांना पंचायत समिती कार्यालयात बसवण्याचा ग्रामस्थांचा निर्णय

प्राजक्ता कासले, वाडा/मोखाडा

**कुपोषणाने दोन** लहानग्यांचे बळी गेलेल्या पालघरमधील मोखाडा तालुक्यातील गावकऱ्यांनी आता शाळेलाच कुलूप ठोकले आहे. पहिली ते आठवीसाठी असलेल्या तीनपैकी दोन खोल्यांची गेल्या मे महिन्यात झाड पडल्याने पडझड झाली. मात्र अजूनही या खोल्यांची दुरुस्ती करायला सरकारी यंत्रणांना जाग आलेली नसल्याने पटावरील १६१ विद्यार्थ्यांसाठी एकच खोली शिल्लक राहिली आहे. अनेकदा सरकारदरबारी खेटे घालूनही दाद घेतली जात नसल्याने शाळेलाच कुलूप ठोकून पंचायत समितीत मुलांना बसवण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला. कुपोषणामुळे सप्टेंबरमध्ये मृत्यू पावलेल्या सागर वाघ व ईश्वर सवरा या मुलांच्या मित्रांचे भविष्य हे असे आहे.

मोखाडा तालुक्यापासून दहा किलोमीटरवर खोच ग्रामपंचायतीत धोंडामाऱ्याची मेठ हे गाव येते. शेजारच्याच कळमवाडीत सागर वाघ या मुलाचा कुपोषणाने मृत्यू झाला होता. त्या वेळी त्याच्या घरी महिला व ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांनी भेट दिली होती. तिथून हाकेच्या अंतरावर असलेल्या पहिली ते आठवीच्या शाळेला कुलूप घालण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. शाळेच्या मागच्या बाजूला असलेले झाड तीन खोल्यांच्या या शाळेवर पडले. त्यामुळे दोन खोल्या मोडल्या आणि मागच्या बाजूला बांधलेल्या शौचालयाचा पार चक्काचूर झाला. संपूर्ण पावसाळा शाळेतील सर्व विद्यार्थी एका खोलीत बसत होते. पावसाळ्यानंतर दोन्ही खोल्यांची डागडुजी व्हावी यासाठी प्रयत्न केले, मात्र आता वर्ष संपत आले तरी जिल्हा परिषदेकडून शाळेच्या बांधकामाला निधी मंजूर झालेला नाही, असे या गावचे सरपंच पांडू मालक यांनी सांगितले. एकीकडे पंतप्रधानांनी स्वच्छ भारत मोहीम हाती घेतली आहे आणि इथे आमच्या शाळेचे शौचालय मोडून पडले आहेत. मुलींची एवढी गैरसोय होत असताना त्या शिकणार कशा, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. शाळेला कुलूप लावल्याने विस्तार शिक्षण अधिकारी आल्या होत्या. मात्र प्रस्ताव पुढे पाठवला आहे, माझ्या हातात काही नाही, शाळा सुरू करा यापलीकडे सांगण्यासारखे त्यांच्याही हाती काही नव्हते. शाळेत आठवीपर्यंत शिकवण्यासाठी फक्त तीन शिक्षक आहेत. मात्र तरीही आजूबाजूच्या परिसरातील शाळांची अवस्था यापेक्षा वाईट असल्याने तेथील मुलेही इथे येतात. आता या शाळेचीही अशी अवस्था झाली की मुले शिकणार कशी, पुढे जाणार कशी, असा प्रश्न गावकऱ्यांनी उपस्थित केला. एकीकडे देश प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना गावकऱ्यांनी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना थेट पंचायत समितीच्या कार्यालयात नेऊन बसवले. कुपोषणामुळे गावाला भेट देणाऱ्या मंत्री व अधिकाऱ्यांच्या मात्र हे गावीही नाही. कुपोषणाचा प्रश्न हा केवळ अन्नाशी नाही तर जीवनशैलीशी निगडित आहे, मात्र अंगणवाडीतील केळे, अंडे व खिचडीपलीकडे या प्रश्नाकडे पाहण्यास सरकारला वेळ नाही, असेच या स्थितीवरून दिसते.


धोंडामारयाची मेठ येथील शाळेवर मे २०१६ मध्ये झाड कोसळले होते. त्यामुळे पडझड झालेल्या दोन खोल्यांची दुरुस्ती अद्याप झालेली नाही.

**■ वाडा आणि मोखाड्याच्या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या मुलांची संख्या पाहता या कुपोषणाचा प्रश्न संपला असेच सरकारला म्हणायचे आहे, असे दिसते. सप्टेंबरमध्ये मंत्र्यांचा दौरा आखण्यात आला तेव्हा मोखाड्याच्या रुग्णालयात ९१ कुपोषित मुलांना आणले गेले होते, त्यापैकी ५८ तीव्र कुपोषित, तर ३९ कुपोषित होती. मंत्र्यांचा दौरा आटोपला आणि ऑक्टोबरमध्ये उपचारांसाठी आलेल्या बालकांची संख्या थेट २६ वर घसरली.**

मोखाड्याच्या बाजारापासून साधारण बारा किलोमीटरवर असलेल्या शिसवण्याच्या पाड्यावर नुकतेच आरोग्य शिबीर घेण्यात आले. तेथून दहा कुपोषित मुलांना मोखाड्याच्या ग्रामीण रुग्णालयात भरती करण्याचा सल्ला दिला गेला. मात्र त्यातील पाचच मुले मोखाड्याच्या रुग्णालयात आली. इथे १४ दिवस राहावे लागते. एवढा वेळ इथे राहिलो तर कामधंदा होणार नाही, म्हणून बाकीची मुलं आली नाहीत, असे जाई दोरे म्हणाल्या. स्वतःच्या तीन वर्षांच्या मुलीसोबत त्या उपचारांसाठी रुग्णालयात राहिल्या होत्या. आम्ही वर डोंगरावर राहतो, त्यामुळे गावात डॉक्टर आले तरी कोणी सांगितल्याशिवाय आम्हाला कळत नाही. मुलं अंगणवाडीत मात्र जातात, त्यांना अंडे, केळे देतात, असे योगिता मालकच्या आजीने सांगितले. या मुलांवर उपचार केले जातात, मात्र त्यांचा इथला आहार बंद झाला, औषधे बंद झाली की ती पुन्हा अशक्त होतात. अनेक मुलांना पुन्हा पुन्हा रुग्णालयात दाखल करावे लागते. शासनाकडून जिल्हा रुग्णालयांना जेवढी मदत यायला हवी, तेवढी येथे मिळते. मात्र मुलांसाठी विशेष डॉक्टर नसल्याने गंभीर स्थिती असलेल्या मुलांना इतर रुग्णालयांत न्यावे लागते, असे येथील वैद्यकीय अधिकारी महेश पाटील म्हणाले.

# मराठा समाजाचे आज चक्काजाम आंदोलन

प्रतिनिधी, मुंबई

**कोपर्डी अत्याचार** प्रकरणातील नराधमांना फाशी मिळावी, ॲट्रॉसिटी कायद्याचा गैरवापर रोखावा, तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासह विविध मागण्यांसाठी सुरू केलेल्या मूक मोर्चानंतर मराठा समाजाने मंगळवारी राज्यभर चक्का जाम आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनात अहमदाबाद महामार्ग अडविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबईत सकाळी १० वाजता चक्काजाम आंदोलनाला सुरुवात होणार आहे. सुरुवातीला मुलुंड, दहिसर, पांजरापोळ येथील टोलनाक्यावर चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. मुंबईचे प्रवेशद्वार बंद केल्यामुळे मुंबई ठप्प करणे हा यामागचा हेतू आहे. याशिवाय दादर येथील चित्रा सिनेमागृह, वरळी नाका, चेंबूर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या ठिकाणीही चक्काजाम करण्याचे मराठी मोर्चाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

नवी मुंबईतील मराठा मोर्चा प्रतिनिधी वाशी टोलनाक्यावरील वाहतूक अडवणार आहे. पालघरचे प्रतिनिधी मुंबई-अहमदाबाद महामार्ग अडवणार आहेत. सकाळी १० वाजता सुरू झालेले आंदोलन दुपारी १ वाजता राष्ट्रगीताने संपणार आहे.

**तरूणांचा विरोध**

मराठा मोर्चाने आयोजित केलेल्या चक्काजामला मराठा समाजातील अनेक तरुणांनी विरोध केला आहे. चक्काजाम करून, कायद्याचे उल्लंघन करून किंवा सर्वसामान्यांच्या दैनंदिन कामात व्यत्यय आणणे चुकीचे आहे. त्यामुळे या चक्काजाममध्ये सहभागी होणार नसल्याचे अनेक मराठा तरूणांनी सांगितले.

**जाहिरातीमुळे कार्यकर्ते संतप्त**

चक्काजाम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर एका दैनिकामध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमुळे आयोजकांत तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. आंदोलनाला गालबोट लागण्याची शक्यता असणारा मजकूर जाहिरातीत प्रसिध्द झाला होता. यामुळे आयोजकांमध्ये गोंधळ उडाला.

# राहुल गांधींविरोधात आरोपनिश्चिती लांबणीवर

## भिवंडी न्यायालयात मानहानीच्या खटल्याची ३ मार्चला सुनावणी

खास प्रतिनिधी, ठाणे

**लोकसभा निवडणूक** प्रचारसभेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या खटल्याच्या सुनावणीसाठी काँग्रेसचे उपाध्यक्ष राहुल गांधी यांनी सोमवारी दुपारी भिवंडी न्यायालयात हजेरी लावली. या सुनावणीत राहुल यांच्यावर आरोप निश्चित करण्यात येणार होते, मात्र राहुल यांना खटल्यातील आरोपांसंबंधी पुरेशी कागदपत्रे न मिळाल्याने आरोपनिश्चिती लांबणीवर पडली आहे. आरोपासंबंधीची सर्व कागदपत्रे राहुल यांना द्यावीत, असा आदेश देत न्यायालयाने खटल्याची सुनावणी ३ मार्चला ठेवली.

महात्मा गांधी यांच्या हत्येमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हात होता, असा आरोप राहुल गांधी यांनी प्रचारसभेत केला होता. या प्रकरणी राजेश कुंटे यांनी राहुल यांच्याविरोधात भिवंडी न्यायालयात मानहानीचा खटला भरला. या खटल्यात राहुल यांना आधीच जामीन मिळाला असून, सोमवारी त्यांच्यावर आरोप निश्चित करण्यात येणार होते. भिवंडी न्यायालयाचे न्यायाधीश तुषार वझे यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

वृत्तवाहिन्यांवरील बातम्या आणि वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांआधारे हा खटला दाखल करण्यात आल्याचा दावा राहुल यांचे वकील नारायण अय्यर यांनी केला. खटल्यातील आरोपासंबंधी केवळ वृत्तवाहिन्यांवरील बातम्यांच्या सीडी देण्यात आल्या असून, वृत्तपत्रांतील बातम्यांची कात्रणे देण्यात आलेली नाहीत, याकडे लक्ष वेधत अय्यर यांनी सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली. ती न्यायालयाने मान्य केली.



**विलंबासाठी न्यायालयाची माफी**

**खटल्याच्या सुनावणीसाठी राहुल गांधी हे सोमवारी दुपारी ११ वाजता हजर राहणार होते, मात्र दिल्लीतील धुक्यामुळे राहुल यांच्या विमानाचे उड्डाण उशिरा झाले. त्यामुळे ते न्यायालयात दोन तास उशिरा पोहोचले. या विलंबाबद्दल राहुल यांनी न्यायालयाची माफी मागितल्याचे वकील नारायण अय्यर यांनी सांगितले.**

**गांधी विचारधारेसाठी माझा लढा - राहुल गांधी**

**महात्मा गांधी यांच्या विचारधारेसाठी माझी लढाई सुरू आहे. त्यामुळे गांधीहत्येच्या विचारधारेविरोधात आणि खादी ग्रामोद्योगाच्या दिनदर्शिकेवरून गांधीजींची छबी हटविणाऱ्या प्रवृत्तीविरोधात मी लढत आहे, असे राहुल गांधी म्हणाले.**

# ‘तलवारबाजी’मुळे ओमी कलानी वादात; सेनेची आयोगाकडे तक्रार

प्रतिनिधी, उल्हासनगर

**भाजपशी सलगी** करताना शक्तिप्रदर्शन करणाऱ्या ओमी कलानी यांनी हातात तलवार घेत मैदानात प्रवेश केला. ही तलवारबाजी ओमी कलानी यांना भोवण्याची चिन्हे आहेत. याबाबत शहर शिवसेनेने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे.

गोल मैदान येथे नुकत्याच झालेल्या भव्य सोहळ्यात ओमी कलानी, भाजप आणि रिपाइंच्या नेत्यांनी हातमिळवणी करत नवी आघाडी स्थापन केली. त्या वेळी शक्तिप्रदर्शन करत ओमी कलानी यांनी गोल मैदान येथे कार्यक्रमस्थळी हातात तलवार घेऊन प्रवेश केला होता. हातात तलवार घेऊन ओमी हे मंचावर आले होते. त्यावर शिवसेनेने आक्षेप घेतला असून शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, शहरप्रमुख राजेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहक संरक्षण कक्षाचे आदेश पाटील यांनी ओमी यांच्या तलवार स्टंटची तक्रार राज्य निवडणूक आयोग, पालिका आयुक्त, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे.

आचारसंहिता भंग करणे व आर्म ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची मागणी या तक्रारीत करण्यात आली आहे. तलवार स्टंट प्रकरण आधीच वादग्रस्त असलेल्या ओमी कलानींच्या अंगलट येण्याची शक्यता आहे. याबाबत चौकशी केली जाणार असल्याचेनिवडणूक अधिकारी राजेंद्र निंबाळकर यांनी सांगितले.

# मल्याचे पाप मनमोहन, चिदम्बरम यांचे!

## भाजपचा आरोप; कर्जे देण्यासाठी बँकांवर दबाव आणल्याचा दावा

विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

**बँकांची कर्जे** बुडवून परदेशात पसार झालेले उद्योगपती विजय मल्या यांना नऊ हजार कोटी रुपयांच्या कर्जाची खिरापत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आणि तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदम्बरम यांच्या दबावानेच वाटल्याचा गंभीर आरोप भाजपने सोमवारी केला. त्यासंदर्भातील पत्रव्यवहार आणि गोपनीय कागदपत्रे पक्षाने उघड केली.

‘किंगफिशर’ या मल्यांच्या बुडालेल्या विमान कंपनीला नियमबाह्य कर्जे दिल्याप्रकरणी आयडीबीआय बँकेचे माजी प्रमुख योगेश आगरवाल यांना अटक केल्यानंतर मल्यांचे पाप ‘यूपीए’ सरकारचे असल्याचे दाखविण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. २००४ ते २०१३दरम्यान त्यांच्या कंपन्यांची कर्जे थकलेली असताना आणि मूल्यांकन नसतानाही मल्यांना अतिवेगात आणि नियमबाह्य पद्धतीने कर्जे वाटली गेल्याचे दाखविणारी ही कागदपत्रे आहेत. त्यात प्रामुख्याने मल्यांनी मनमोहन सिंग व चिदम्बरम यांना लिहिलेल्या पत्रांचा समावेश आहे. त्या आधारावरच भाजपचे प्रवक्ता डॉ. संभित पात्रा यांनी तोफ डागली.

‘एका बुडू लागलेला पक्षाने एका बुडू लागलेल्या विमान कंपनीवर केलेल्या मेहेरबानीची लक्तरे या कागदपत्रांतून स्पष्ट दिसताहेत. मनमोहनांच्या दबावाने मल्यांची गोठविलेली बँक खाती मुक्त करण्यात आली, थकीत कर्जाची फेररचना (बेलआऊट पॅकेज) करून त्यांना मदत करण्यात आली. तर मल्यांविरुद्ध कडक कारवाई करणाऱ्या स्टेट बँकेचे हात चिदम्बरम यांनी बांधले. आणि असले पाप करणारे आता पोपटासारखे बोलत होते. राहुल गांधींना हात या चिन्हामध्ये धार्मिक प्रतीके दिसतात. पण त्यांना मल्यांवर मेहेरबानी करणारे भ्रष्ट हात दिसत नाहीत,’ अशी खोचक टिप्पणी त्यांनी केली.

मागील दोन मार्च रोजी देशातून पळालेले मल्या सध्या ब्रिटनमध्ये आहेत. त्यांना भारतात आणण्यासाठी मोदी सरकारकडून प्रयत्न चालू आहेत.

**मल्या पळून कसा गेला ते आधी सांगा : काँग्रेस**

**भाजपच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना नऊ हजार कोटींची थकबाकी असताना मल्या परदेशात पळून गेलाच कसा ? त्याला सरकारने का अडविले नाही ? असा सवाल काँग्रेसने विचारला. तसेच मल्यांची बाराशे कोटी रुपयांची थकीत कर्जे माफ करण्याबाबतही टीका केली. पण त्याच वेळी मनमोहन सिंग, चिदम्बरम यांच्यावरील आरोपांबद्दल पक्षाने पूर्ण मौन पाळले.**

# प्राप्तिकर विभागाची ८७ जणांना नोटीस

पीटीआय, नवी दिल्ली

**नोटाबंदीनंतर काळा** पैसा साठविणाऱ्यांविरुद्ध प्राप्तिकर विभागाने कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. प्राप्तिकर विभागाने बेनामी व्यवहार कायद्यानुसार सोमवारी ८७ जणांना नोटिसा जारी केल्या असून देशभरांत ४२ प्रकरणांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या बँक ठेवींवर टांच आणली आहे.

नोटाबंदीनंतर सरकारने जाहिराती दिल्या आणि आपल्याकडील बेहिशेबी जुन्या नोटा अन्य कोणाच्या खात्यामध्ये जमा न करण्याबाबत इशारा दिला होता. त्यानंतर सखोल चौकशी करून प्राप्तिकर विभागाने ८७ जणांना नोटिसा जारी केल्या तर ४२ मालमत्तांवर टांच आणली आहे. प्राप्तीकर विभाग कारवाईची व्याप्ती वाढविण्याचे संकेत आहेत.

# ‘जुन्या वर्सोवा खाडीपुलाच्या दुरुस्तीचा अहवाल सादर करा’

खास प्रतिनिधी, ठाणे

**मुंबई-अहमदाबाद** महामार्गावरील वर्सोवा येथील जुन्या खाडीपुलास तडे गेल्याने पूल चार महिन्यांपूर्वी वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. प्रत्यक्षात चार महिने उलटूनही पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरू होऊ शकले नसल्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सोमवारी तातडीची बैठक घेऊन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. पुलाच्या दुरुस्तीकामाचे वेळापत्रक कसे असेल, याचा अहवाल सादर करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वर्सोवा येथे दोन खाडीपूल आहेत. त्यापैकी जुना पूल १९७० मध्ये बांधण्यात आला असून तो १९७३ मध्ये वाहतुकीसाठी खुला झाला. या पुलाच्या एका गर्डरला डिसेंबर २०१३ मध्ये तडे गेल्याने हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. त्यानंतर या पुलाला पुन्हा तडे गेल्याने चार महिन्यांपूर्वीच म्हणजे ऑगस्टमध्ये तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यामुळे या भागातील वाहतूक नव्या खाडी पुलावरून सुरू असली तरी वाहनांची संख्या लक्षात घेऊन या भागातील वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. या बदलांमुळे गेल्या चार महिन्यांपासून या मार्गे प्रवास करणाऱ्या नागरिकांना वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. त्याची दखल घेत ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सोमवारी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली.

पुलाच्या दुरुस्तीसंदर्भात नेमण्यात आलेल्या राम्बोल इंडिया लिमिटेड या सल्लागार कंपनीने काही दिवसांपूर्वीच आयआयटीला अहवाल दिला आहे. मात्र, आयआयटीने त्यासंबंधी अद्याप अहवाल दिलेला नाही. तो अहवाल मिळताच दुरुस्तीबाबत पुढील कार्यवाही सुरू होईल, असे आयआरबी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.

# सीमाशुल्क दिन साजरा

**मुंबई :** मुंबई सीमाशुल्क विभागाच्या वतीने २७ जानेवारी २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृहात आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क दिन साजरा करण्यात आला. ‘प्रभावशाली सीमाव्यवस्थापनासाठी माहितीचे विश्लेषण’ या विषयावर हा दिन यंदा साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर गोदरेज समूहाचे अध्यक्ष अदी गोदरेज हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. राजेश अग्रवाल, संयुक्त सचिव, भारत सरकार हे प्रमुख वक्ते म्हणून हजर होते. या कार्यक्रमाला २० देशांचे राजनैतिक अधिकारी हजर होते. त्याचप्रमाणे केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थीही मोठ्या संख्येने हजर होते. महसूल जमा करण्याच्या कामात सीमाशुल्क विभागाचे किती महत्त्व आहे ते गोदरेज यांनी अधोरेखित केले. देशाच्या सर्वांगीण विकासांत सीमाशुल्क विभाग यापुढेही चांगले योगदान देईल, अशी अपेक्षा गोदरेज यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यापार सुविधा आणि करचुकवेगिरी आणि तस्करी करणाऱ्यांच्या मनांत भीती निर्माण करण्याबाबत सीमाशुल्क विभाग संतुलन राखत असल्याबद्दल विभागाची स्तुती केली.

केंद्रीय मत्स्योद्योग तंत्रज्ञान संस्थेचे मुंबई संशोधन केंद्र
सिडको प्रशासन भवन, सेक्टर-१, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३
ऑफिस : ०२२-२७८२६०१७, फॅक्स : ०२२-२७८२७४१३,
ई-मेल : ciftmum@gmail.com
वॉक-इन-इंटरव्ह्यू
तारीख : १०.०२.२०१७ रोजी स. १०.००
सीनिअर रिसर्च फेलोच्या एका पदाकरिता योजनेच्या एक वर्ष / को-टर्मिनसकरिता कंत्राटी तत्त्वावर फेलोशिप रु. २५,०००/- दरमहा + ३०% एचआरए, अधिक तपशील व अर्जप्रक्रिया याकरिता कृपया भेट द्या : www.cift.res.in
सायंटिस्ट इन्चार्ज

Maharashtra Airport Development Co. Ltd.
(CIN:U45203MH2002SGC136979)
8th Floor, World Trade Centre -1, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel No.: 022– 49212121/22, Fax No.: 022–22163814
E-mail: vcmd@madcindia.org
MADC
Re-Invitation
MADC Re- invites tenders from reputed contractors for the work of Supply, Installation, Testing & Commissioning of HVAC system for the existing Terminal building at Shirdi airport, Dist. Ahmednagar, Maharashtra
The tender document and other details can be downloaded from e-tender portal **https://mahatenders.gov.in** from **1300 Hrs** from **31.01.2017**. Further clarifications / corrigendum in this regard, if any will be put only on e-tender portal.
Vishwas Patil
Vice Chairman and Managing Director

क्रॉम्प्टन ग्रीव्हज् लिमिटेड
CIN No.: L99999MH1937PLC002641
नोंदणीकृत कार्यालय: ६वा मजला, सीजी हाऊस, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०३०. फोन नं.: ०२२ – २४२३७७७७, फॅक्स नं.: ०२२ – २४२३७५४५
सूचना
सिक्युरिटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीकरण आबंधन आणि प्रकटन आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन ४७ च्या अनुरोधाने, ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही अलेखापरीक्षित वित्तीय निकाल आणि विभागवार वित्तीय अहवाल, **स्वतंत्र तसेच एकत्रित अशा दोन्ही तत्त्वांवर**, इतर व्यवसायासोबत, विचारात घेण्यासाठी आणि त्यांची नोंद करण्यासाठी कंपनीच्या संचालकीय मंडळाची बैठक ही शुक्रवार, १० फेब्रुवारी, २०१७ रोजी घेण्यात येईल.
क्रॉम्प्टन ग्रीव्हज् लिमिटेड करिता
मनोज कौल
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
एसीएस 16902
ई–मेल: investorservices@cgglobal.com
वेबसाईट: www.cgglobal.com
स्टॉक इक्सचेंजेसची वेबसाईट: www.bseindia.com/www.nseindia.com
स्थळ : मुंबई
दिनांक : ३० जानेवारी, २०१७

ठाणे महानगरपालिका, ठाणे
सार्वजनिक आरोग्य विभाग
निविदा सूचना
ठाणे महानगरपालिकेच्या कोरस रुग्णालय व घोडबंदर येथील रोझा गार्डनिया या रुग्णालयांसाठी अत्याधुनिक मॉडयुलर ओ.टी. उभारणी करणेसाठी ऑन लाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatender.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ०१/०२/२०१७ ते दिनांक.१४/०२/२०१७ पर्यंत संध्या.१६.०० बाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. दिनांक.१४/०२/२०१७ रोजी संध्या.१६.०० बाजेपर्यंत ऑनलाईन निविदा स्विकारण्यात येतील. दिनांक.१७/०२/२०१७ रोजी संध्या १६.०० बाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन उघडण्यात येतील.
ठामपा/पिआरओ/आरोग्य/2397/2016-17
दि:30.01.2017
सही/-
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
ठाणे महानगरपालिका,ठाणे
pls visit our official web-site
www.thanecity.gov.in

एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड
कॉर्पोरेट आयडेंटीफीकेशन नंबर (सीआयएन): L45200MH2002PLC136779
रजिस्टर्ड ऑफीस: ए. ४१२, बूमरँग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडिओ जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०७२
इ.मेल: investorrelations@mepinfra.com वेबसाईट: www.mepinfra.com
टेलिफोन : ९१ २२ ६१२० ४८०० फॅक्स: ९१ २२ ६१२० ४८०४
याद्वारे नोटीस दिली जाते की सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम ४७ (१) नुसार कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक सोमवार दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ रोजी आयोजित करण्यात आली असून त्यात कंपनीच्या ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपलेल्या तिसऱ्या त्रैमासिकाकरीता आणि नऊ महिन्याकरीता एकल आणि एकत्रित अशा दोन्ही प्रकारच्या अलेखापरिक्षित वित्तीय अहवालाचा विचार करून, मान्यता देऊन नोंदवण्यात येणार आहे. आणि आर्थिक वर्ष २०१६-२०१७ साठी अंतरिम लाभांश असल्यास ते घोषित करण्याचा विचार केला जाईल. याशिवाय सेबी (प्रोहिबिशन ऑफ इनसाइडर ट्रेडींग) रेग्युलेशन्स २०१५ आणि कंपनीच्या ‘कोड ऑफ कंडक्ट फॉर प्रिव्हेन्शन ऑफ इनसाइडर ट्रेडींग’ नुसार कंपनीच्या सिक्युरिटीजमध्ये व्यापार करण्यासाठी ट्रेडींग विंडो ३० जानेवारी, २०१७ ते १५ फेब्रुवारी, २०१७ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील.
सदर नोटीस कंपनीच्या www.mepinfra.com या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाइट www.bseindia.com आणि www.nseindia.com वरही उपलब्ध असेल.
संचालकमंडळ करिता
एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड
Sd/-
श्रीधर फडके
कंपनी सेक्रेटरी
ठिकाण: मुंबई
दिनांक: २८/०१/२०१७

पाहिजेत
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात / परिसंस्थेत शैक्षणिक वर्ष 2016-2017 मध्ये प्राचार्य व विविध अध्यापकांची पदे भरावयाची आहेत. शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, प्रवर्ग, संवर्ग, अर्ज करण्याची मुदत, महाविद्यालयाचा पत्ता इ.बाबतची माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाच्या आत संबंधित उमेदवारांनी त्या त्या महाविद्यालयात अर्ज सादर करावेत.
टीप : मे.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेली याचिका क्र. 12051/2015 च्या अनुषंगाने मे.न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून सदरच्या जाहिराती प्रसिध्द करण्यात येत आहेत.
1. Swodharak Arts & Science College, Dondaicha : Geography
2. R.C.Patel Arts, Com. & Sci College, Shirpur : Dir. of Phy. Edu.
3. Sadguru College of Education, Jalgaon : History & Librarian.
4. Sadguru College of Physical Education, Jalgaon : Principal, B.P.Ed., M.P.Ed., & Librarian.
5. P.J.N. College of Social Work, Amalner : Principal.
6. ST.Co.Op. Inst. of Mgt. Res. & Devp. Shahada : Dir. of Phy. Edu.
7. KCES's College of Engg. & Information Tech., Jalgaon : Principal.
8. PSGVP College of Pharmacy, Shahada : B.Pharm. & M.Pharm. Pharmaceutics, Pharmacology, Pharm. Chemistry, Pharm. Analysis, Pharmacognosy, Quality Assurance & Librarian (Professor, Associate & Asst. Professor).
Date : 25/01/2017
OFFG. REGISTRAR

टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड
एल्फिन्स्टन बिल्डिंग, १०, वीर नरिमन रोड, मुंबई - ४०० ००१.
टेलि.: ९१ २२ ६६६५ ८२८२
फॅक्स: ९१ २२ ६६६५ ७९१७
सीआयएन: एल६७२००एमएच१९३७पीएलसी००२६२२
ईमेल: ticl@tata.com
वेबसाइट: www.tatainvestment.com
सूचना
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१६ च्या २९ यासह वाचलेल्या रेग्युलेशन ४७ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपलेल्या तिमाही/नवमाहीकरिता अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्ष, इतर गोष्टींसमवेत, विचारात घेण्याकरिता व मान्य करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा सोमवार, दि. १३ फेब्रुवारी, २०१७ रोजी मुंबई येथे घेण्यात येणार आहे.
वरील तपशील www.tatainvestment.com या कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच www.nseindia.com या एनएसईच्या संकेतस्थळावर आणि www.bseindia.com या बीएसईच्या संकेतस्थळावर पाहता येईल.
संचालक मंडळाच्या आदेशाद्वारा
टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड
मनोज कुमार सी. व्ही.
मुख्य वित्तीय अधिकारी व कंपनी सचिव
मुंबई, ३० जानेवारी, २०१७.
TATA

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रोजेक्ट (पीॲण्डसीएस) डिपार्ट., मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई-४०० ०७४
टेलि. क्र. : +९१-२२-२५५३ ३२१२/२५५३ ३२९५ - फॅक्स : +९१-२२-२५५४ ५९७८
निविदा मागविणारी देशस्थ सूचना
(सीआरएफक्यू नं. : १०००२७३६५४)
बीपीसीएल, प्रोजेक्ट (पीॲण्डसीएस) डिपार्ट., मुंबई रिफायनरी हे खालील निविदांकरिता बोली मागवीत आहेत :

| | |
|---|---|
| ई-निविदा क्र. / सीआरक्यूएफ क्र. | २०९१७/१०००२७३६५४ |
| कामाचे नाव | बीपीसीएल मुंबई रिफायनरी, माहुल येथील डीएचटी प्रोजेक्टकरिता फ्रेश मिथिल डाय इथॅनोल अमाइनचे प्रापण. |
| संकेतस्थळावर उपलब्ध बोली कागदपत्रे : | ३१.०१.२०१७ पासून ते २१.०२.२०१७ पर्यंत. |
| बोली सादरीकरणाची नियत तारीख व वेळ : | २१.०२.२०१७ रोजी दु. ०२.०० वा.पर्यंत (भाप्रवे) |

निविदेचा तपशील खालील संकेतस्थळांवरून डाऊनलोड करता येईल :
• https://www.bharatpetroleum.in/tenders/view-tenders.aspx
• सेन्ट्रल पब्लिक प्रोक्युअरमेन्ट पोर्टल : http://eprocure.gov.in/cppp
• बीपीसीएल प्रोक्युअरमेन्ट पोर्टल : https://bpcleproc.in
महत्त्वाचे : सर्व अद्ययावत तपशील, सुधारणा, शुद्धिपत्रे इ. (जर असल्यास) वरील संकेतस्थळांवरच केवळ जारी करण्यात येतील. वृत्तपत्रे किंवा अन्य कोणत्याही प्रसारमाध्यमांद्वारा याबाबत प्रसिद्ध केली जाणार नाही.
#GiveItUp
एनरजाइजिंग लाइव्ज; एनरजाइजिंग बिझनेस

GAIL (India) Limited
(A Govt. of India Undertaking)
निविदा मागविणारी सूचना
खुल्या देशीय स्पर्धात्मक बोली
**गेल (इंडिया) लिमिटेड** हे निविदा कागदपत्रांच्या अनुसार पूर्णतः खाली सविस्तरपणे दिलेल्या विषयाधीन कामाकरिता **ई-निविदा पोर्टलमधील एकेरी स्तरावरील द्वि-बोली पद्धतीत** ई-निविदाद्वारा भावी बोलीदारांकडून त्यांच्या बोली मागवीत आहेत.
**बोली कागदपत्रे क्र.:** गेल/ एमयू/ सीॲण्डपी/ओॲण्डएम/१६/सी०५७; **बोलींचे वर्णन :** मुंबई अधिकारितेंर्गत डीपीपीएल प्रदेश व डीयूपीएल, ट्रॉम्बेमधील एसव्ही व आयपी स्थानकांकरिता संबंधित कामे आणि कॉन्सर्टिना कॉइल, बाऊण्ड्री वॉल्सचे बांधकाम; **ई-निविदा क्र. :** ८०००१०४७३; **निविदेचा प्रकार :** https://etender.gail.co.in या आमच्या ई-निविदा पोर्टलद्वारा ई-निविदा प्रक्रिया; **संकेतस्थळावर बोली कागदपत्रांची उपलब्धता :** ०१.०२.२०१७ रोजीपासून; **पूर्व-बोली सभा :** १४.०२.२०१७ रोजी स. ११.०० वा.; **पूर्व-बोली सभेचे ठिकाण :** गेल (इंडिया) लिमिटेड, गेल भवन, प्लॉट नं. ७३, रोड नं. ३, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र; **बोलींच्या सादरीकरणाची नियत तारीख :** २८.०२.२०१७ रोजी दु. ०२.०० वा.पर्यंत; **किंमत न दिलेल्या बोलींच्या उघडण्याची नियत तारीख :** २८.०२.२०१७ रोजी दु. ०३.०० वा.
बोलींच्या पात्रता कसोट्यांसमवेतील (बीक्यूसी) संपूर्ण निविदा कागदपत्रे https://etender.gail.co.in आणि www.gailtenders.in या गेलच्या संकेतस्थळांवर आणि https://eprocure.gov.in या सरकारी संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. कोणतीही शंका असल्यास कृपया मुख्य व्यवस्थापक (सीॲण्डपी), गेल, मुंबई (फोन : ०२२-२७५८१२०१, विस्तार- ३८०/ ३८२/ ३८६/ ३८८, रिसेप्शन नं. : ०२२-२७५६६०८२, फॅक्स : ०११-२६१८५९४१, विस्तार- १५८३१#; ई-मेल : uv.jadhav@gail.co.in; kmkrao@gail.co.in; magaikwad@gail.co.in
वरील निविदेबाबत कोणतीही सुधारणा, स्पष्टीकरण, पूरकपत्रे, शुद्धिपत्रे, वेळेतील विस्तार इ. सविस्तर माहिती https://etender.gail.co.in व www.gailtenders.in आणि https://eprocure.gov.in या संकेतस्थळांवरच जारी करण्यात येईल आणि त्याकरिता कोणतीही स्वतंत्र अधिसूचना निर्गमित केली जाणार नाही. बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी अद्ययावत माहितीकरिता स्वतः नियमितपणे संकेतस्थळांना भेट द्यावी.
कॉर्पोरेट नोटिफिकेशन नं. : एल४०२००डीएल१९८४जीओआय०१८९७६
"Safety First and Safety by Heart". Call us at 15101 (toll free) in case of any Safety Concerns